## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/उजि/टे-६/३क/सुना/नोटीस/२०१७/ ३८०
दिनांक- 16 DEC 2017

### सुनावणी नोटीस

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **कब्जेदार :- (न.भू.क्र. ६७६, ६७७/अ पै)**<br>१. कु.यमुना जंगल्या खांजोडे<br>२. कु.देवका जंगल्या खांजोडे<br>३. धर्मी लक्ष्मण<br>४. श्रीम. सुरेखा रतन खांजोडे<br>५. कु.दिपाली रतन खांजोडे<br>(पत्ते उपलब्ध नाहीत) | २. | **इतर हक्क धारक :- (न.भू.क्र. ६७७/अ पै)**<br>१. चंद्रकांत धर्मा गडगे<br>२. अनू लक्ष्मण भुरे<br>३. कमला धर्मा गडगे<br>४. शोभा शिवराम गडगे<br>५. चित्रा शिवराम गडगे<br>६. देवेंद्र शिवराम गडगे<br>(पत्ते उपलब्ध नाहीत) |

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत.**
**मौजे- मालाड (पूर्व), ता- बोरीवली, न.भु.क्र. ६१०अ/१क (पै), ६७६, ७७अ (पै), ६८० (पै) या मिळकतीवरील क्षेत्र अर्जदार श्री. रवि रघुनाथ खांजोडे व इतर १६ यांचे मागणीनूसार महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क)(१)अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करणेस हरकत अर्जाबाबत सुनावणी.**

विषयांकित मौजे- मालाड (पूर्व), तालुका- बोरीवली येथील न.भू.क्र. ६१०अ/१क (पै), ६७६, ७७अ (पै), ६८० (पै) या मिळकतीवरील क्षेत्र अर्जदार श्री. रवि रघुनाथ खांजोडे व इतर १६ यांनी प्राधिकरणात केलेल्या मागणी अर्जाचे अनुषंगाने कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत हरकतदार/तक्रारदार यांनी हरकती उपस्थित केलेल्या आहेत. तरी प्रकरणी आपले म्हणणे ऐकून घेणेकरिता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात सुनावणी प्रक्रिया सुरु असुन पुढील सुनावणी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समोर **दि. १५/०१/२०१८** रोजी **दुपारी १२.३० वाजता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, सुनावणी कक्ष, ३ रा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१** येथे ठेवण्यात आली आहे.

सदर सुनावणीस आपण सर्व संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांनी प्राधिकरणात दाखल केलेला अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध आहेत. तरी सुनावणीपुर्वी प्राधिकरणात प्रत्यक्ष उपस्थित राहुन सदरील अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. आपण सदर दिवशी व वेळी सुनावणीस उपस्थित न राहिल्यास आपणांस काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

16/12/17

**उपजिल्हाधिकारी (प.उ.)**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.**
दुरध्वनी क्र. ०२२ - २६५९०५१९ / ०४०५ / १८७९ / ०९९३ फॅक्स - ९१ - २२ - २६५९०४५७, ई मेल - info@sra.gov.in